# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) परीक्षेच्या कामकाजात ज्या शिक्षकांनी जाणून-बुजून उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकन कामकाजात सहभाग घेतला नाही त्या शिक्षकांवर कार्यवाही करण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि. १७ जानेवारी रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक झाली. मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी बैठकीत झालेल्या निर्णयाविषयी माहिती दिली. परीक्षेच्या कामकाजाबाबत विद्यापीठाच्या आदेशाचे पालन न करणे ही बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम ४८(४) मध्ये नमूद तरतुदीचे उल्लंघन करणारी असून ज्या शिक्षकांनी जाणून-बुजून उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकन कामकाजात सहभाग घेतला नाही, त्या शिक्षकांवर कार्यवाही करण्याचा निर्णय या बैठकीत झाला. हिवाळी २०२३ च्या ज्या परीक्षेचे निकाल जाहीर झाले आहेत त्यांचे फोटोकॉपी, गुण पडताळणी आणि पुनर्मूल्यांकन, निकाल जाहीर होण्याची संभाव्य तारीख, निकाल सुधारित होण्याचा कालावधी याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर NEWS AND ANNOUNCEMENTS या लिंकवर प्रसिध्द करण्यात आली आहे. ज्या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले नाहीत, त्यांचे निकाल जाहीर झाल्यानंतर सदर माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे असे प्रा. योगेश पाटील यांनी सांगितले.

उन्हाळी २०२४ परीक्षेचे अर्ज भरण्याची मूदत संपण्यापूर्वीच हिवाळी परीक्षेचे फोटोकॉपी, गुण पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनाचे निकाल जाहीर करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा दि. २६ ऑक्टोबरपासून सुरू होवून दि. १५ जानेवारीपर्यंत पार पडल्या. या सर्व परीक्षांचे निकाल ३० दिवसांच्या आत जाहीर झाले आहेत. मूल्यांकन प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्व शिक्षकांचे तसेच मूल्यांकन प्रक्रियेतील इतर सर्व घटकांचे या बैठकीत अभिनंदन करण्यात आले.

विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभापासून ते ३१ व्या दीक्षांत समारंभापर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रांसाठी अर्ज करूनही प्रमाणपत्र नेलेले नाही किंवा टपालाव्दारे पाठविलेले पत्र अपु-या पत्त्यामूळे परत आलीत व संपर्क क्रमांक बदललेले आहेत. त्या अवितरीत प्रमाणपत्रांची एकत्रित तपशिलवार सुची विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी ई-मेल दिले आहेत त्यांना प्रमाणपत्र घेवून जाण्याबाबत सुचित करण्यात यावे असे या बैठकीत ठरल्याची माहिती प्रा. योगेश पाटील यांनी दिली.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाच्यावतीने दि. २ ते दि. १६ जानेवारी २०२४ या कालावधीत ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने प्राणायाम कार्यशाळा घेण्यात आली.

विद्यापीठातील शिक्षक, कर्मचारी, विद्यापीठ निवासस्थानातील कर्मचा-यांचे कुटूंबीय, वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यासाठी झालेल्या या कार्यशाळेत प्राणायामाबाबत प्रा. गीतांजली भंगाळे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी शंखनादही शिकवला. या कार्यशाळेचा समारोप आंतरविद्याशाखा प्रशाळेच्या प्रभारी संचालक डॉ. मनीषा इंदाणी यांच्या उपस्थितीत पार पडला. समारोपाप्रसंगी सीमा पाटील, डॉ. राहूल निकम, रमेश महाजन, शेखरसिंग चौहान, ज्ञानेश्वर पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात सुरू असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात बुधवारी सामाजिक, निसर्ग, कृषी संस्कृती, लेवाबोली अशा विविध विषयांवर सादर झालेल्या कवितांनी कवी संमेलन रंगले.

मराठी विभागप्रमुख प्रा. म. सु. पगारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कवी संमेलनात कवयित्री पुष्पा साळवे, संध्या महाजन, गो. शि. म्हसकर, प्रा. बी. एन. चौधरी, प्रभाकर महाजन, संजीवकुमार सोनवणे यांनी विविध कविता सादर केल्या. प्रा.

म. सु. पगारे यांनी देखील कविता सादर केली. प्रा. भारती सोनवणे यांनी सुत्रसंचालन केले. संजीवकुमार सोनवणे यांनी कवींचा परिचय करून दिला.

दरम्यान या पंधरवड्यानिमित्त मंगळवारी "मराठी विद्यापीठाची आवश्यकता" या विषयावर समूह चर्चा झाली. या चर्चेत डॉ. कुष्णा संदानशिव, डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. दीपक खरात, डॉ. पुरूषोत्तम पाटील, आकाश कोंगळे, सुवर्णा कोळी, प्राजक्ता राजपूत, भारती सोनवणे व विद्यार्थ्यांतर्फे अश्विनी श्रावणे, ऋषिकेश बारे, पवन वसावे, विनोद पावरा, अभिषेक इंगळे, कविता बोरसे, गायत्री वळवी, निलेश चौरे यांनी सहभाग घेतला. विभागप्रमुख प्रा. म. सु. पगारे यांनी समारोप केला.

**बातमी क्रमांक ४**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ जानेवारीपासून सुरू होणारी जळगाव जिल्हास्तरीय साहस कार्यशाळा आता दि. १ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. तारखेतील हा बदल विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावा. असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

जळगाव जिल्हास्तरीय साहस कार्यशाळा दि. २२ जानेवारी ते दि. २४ जानेवारी दरम्यान जाहीर करण्यात आली होती मात्र आता तारखेमध्ये बदल करण्यात आला असून दि. १ फेब्रुवारी ते दि. ३ फेब्रुवारी या कालावधीत ही कार्यशाळा होणार आहे. सहभागी होणा-या विद्यार्थ्यांनी दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता चोपडा बसस्टॅण्ड येथे उपस्थित राहावे. कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती कळविण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्र व महाविद्यालयाचे शिफारस पत्र दि. ३० जानेवारीपर्यंत प्राचार्य समाजकार्य महाविद्यालय, चोपडा यांना ई-मेलव्दारे पाठवायचे आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर याबाबतची माहिती देण्यात आली आहे. अशी माहिती संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

..................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १८ जानेवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी